मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मतदारसंघातील 25 लाख मतदार माझे नातेवाईक

## नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान व्हावेत हीच देशातील बहुतांश नागरिकांची भावना – खासदार बारणे

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील सर्व 25 लाख मतदार हे माझे नातेवाईक आहेत, असे उद्गार शिवसेना-भाजप- राष्ट्रवादी- आरपीआय-रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (सोमवारी) पत्रकार परिषदेत काढले. देशाची सुरक्षितता व गतिमान विकास यासाठी नरेंद्र मोदी हेच पुन्हा पंतप्रधान व्हावेत, अशी देशातील बहुतांश नागरिकांची भावना आहे. त्याचबरोबर गेल्या दहा वर्षात मी केलेले काम आणि मतदारसंघात सातत्याने ठेवलेला संपर्क यामुळे आपण विक्रमी मताधिक्याने निवडून येऊ, असा विश्वास बारणे यांनी यावेळी व्यक्त केला.

मावळ लोकसभा मतदारसंघातील प्रचाराबाबत माहिती देण्यासाठी महायुतीच्या वतीने कासारवाडी येथील कलासागर हॉटेलमध्ये पत्रकार परिषद घेण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

त्यावेळी माजी खासदार अमर साबळे, आमदार उमा खापरे, अण्णा बनसोडे, अश्विनी जगताप, भाजपच्या शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष अजित गव्हाणे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, आरपीआयच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, मावळ मतदार संघ समन्वयक सदाशिव खाडे, रासपचे कार्याध्यक्ष परमेश्वर बुरले, उपाध्यक्ष अजित चौगुले तसेच अमित गोरखे, सुजाता पलांडे, नामदेव ढाके,



अनुप मोरे, राजू दुर्गे, नीलेश तरस, मोरेश्वर शेडगे, माऊली थोरात, नारायण बहिरवाडे, राजेश पिल्ले, संजय मंगोडेकर, कुणाल वाव्हळकर आदी प्रमुख पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

गेल्या दहा वर्षांत मतदारसंघात केलेल्या विकास कामांचा आढावा खासदार बारणे यांनी यावेळी सादर केला. पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. महाविकास आघाडीच्या उमेदवाराकडून नात्यागोत्याचे राजकारण केले जात असल्याबद्दल पत्रकारांनी छेडले असता बारणे म्हणाले की, या मतदारसंघातील सर्व 25 लाख मतदार हे माझे नातेवाईक व हितचिंतक आहेत.

विरोधी उमेदवाराबद्दल पत्रकारांनी छेडल्या असता बारणे म्हणाले की, मला तर विरोधी उमेदवाराचे नाव देखील माहित नाही. उमेदवारी अर्ज भरल्यानंतरच मला विरोधी उमेदवाराचे नाव समजेल.

**उमेदवारी अर्ज 22 तारखेला भरणार**

आपण 22 एप्रिलला उमेदवारी अर्ज भरणार असून त्यावेळी महायुतीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती बारणे यांनी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार तसेच विविध मंत्र्यांच्या मावळ मतदारसंघात सभा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह महायुतीकडे स्टार प्रचारकांची मोठी यादी आहे. त्यापैकी निश्चित होतील त्या सभांची वेळोवेळी माहिती देण्यात येईल, असे ते म्हणाले.

महायुतीच्या कोणत्याही घटक पक्षांमध्ये कोणत्याही प्रकारची नाराजी नाही. नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान व्हावेत, या एकाच भावनेने सर्वजण मेहनत घेत आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. मावळमधील सहाही आमदार महायुतीचे आहेत. बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्था देखील महायुतीच्या ताब्यात आहेत, यापूर्वी शिवसेना, भाजपा, आरपीआय युती होती. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसही सामील झाल्याने ही महायुती झाली आहे. त्यात मनसेने महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला आहे, याकडेही बारणे यांनी पत्रकारांचे लक्ष वेधले.

# राजकीय सभ्यता जपणारा मावळा!

## खासदार अमोल कोल्हे यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्वाचा पुन्हा एकदा प्रत्यय

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार अमोल कोल्हे यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्वाचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. खासदार अमोल कोल्हे रविवारी भोसरी विधानसभेतील इंद्रायणीनगर भागात गाव भेट दौऱ्यावर होते. यावेळी निओ रिगल सोसायटीत मतदारांना भेटत असताना त्यांचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. खासदार कोल्हे यांच्या स्वागतानंतर सोसायटीतील रहिवाशी आपले मनोगत मांडत होते. त्याच वेळी एका ज्येष्ठ नागरिकाने आपल्या मनातील खदखद व्यक्त केली.

आपल्या मनातील खदखद व्यक्त करत असताना या ज्येष्ठ नागरिकाने माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याबद्दलची नाराजी तीव्र शब्दात व्यक्त करायला सुरुवात केली. त्यांच वेळी भाषेतील कडवटपणा लक्षात येताच, कोल्हे यांनी तत्काळ त्यांना थांबवलं आणि माईक आपल्या हातात घेतला.

शरद पवार यांची साथ सोडून गेलेल्यांमुळे सर्वांनाच मनस्ताप झाला, हे खरं असलं



तरी टीका करताना आपण आपली राजकीय सभ्यता सोडायची नाही, असं आवाहन केलं. समोरून राजकारणाचा स्तर घसरला असला तरी आपण आपला स्तर घसरू द्यायचा नाही, असे हात जोडून आवाहन कोल्हे यांनी मतदारांना केलं.

कोल्हे यांनी दाखवलेल्या सुसंस्कृतपणाबद्दल मतदारांनी टाळ्या वाजवून कौतुक केलं. शिवनेरी किल्ल्यावरही कोल्हे यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांची भेट झाली असता कोल्हे यांनी त्यांच्या वयाचा मान राखत त्यांच्या पाया पडून नमस्कार केला होता. कोल्हे यांच्या याच सुसंस्कृतपणाचा अनुभव रविवारी इंद्रायणीनगरमधील मतदारांनीदेखील घेतला.

# 'एलरो' आणि 'युनिकॉर्न' पबवर महापालिकेचा हातोडा

## अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त : महापालिकेच्या बांधकाम विभागाची कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

येरवड्यातील कल्याणी नगर परिसरातील एलरो' आणि 'युनिकॉर्न' या दोन्ही पबवर पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने शनिवारी हातोडा चालवत अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले. पुणे पोलिसांनी या पबचे बेकायदा बांधकाम पाडण्यासाठी पुणे महापालिकेला पत्र दिले होते. यापूर्वी देखील मागील वर्षी दोन वेळा पत्र देण्यात आलेले होते. महापालिकेकडून बोटचेपी भूमिका घेतली जात होती. मात्र, पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी कारवाई करण्याबाबत कडक धोरण आवलंबल्याने महापालिकेला कारवाई करावी लागली.

शहरातील पब, बार, रेस्टॉरंट आणि रूफ टॉप हॉटेलला रात्री दीड वाजेपर्यंत परवानगी देण्यात आली आहे. यावेळेनंतर हॉटेल सुरू ठेवल्यास कारवाईचा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला होता.

मात्र त्या नंतरही रात्री उशीरापर्यंत सुरु राहत होते. यासंदर्भात तक्रारी आल्यानंतर गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने कल्याणी नगर येथील युनिकॉर्न हाऊस व एलरो या पबवर कारवाई करत २८ लाखाचा मुद्देमाल जप्त करत ८ जणांवर गुन्हा दाखल केला होता. येरवड्यातील (कल्याणीनगर) युनिकॉर्न आणि एलरो पबवर पुणे पोलिसांनी कारवाई केल्यानंतर महापालिकेच्या बांधकाम विभागानेही एलरो पबवर शनिवारी कारवाई केली.



या कारवाई नंतर पुणे पोलिसांनी संबंधीत पबवर कारवाई करण्याचे पत्र महापालिकेला दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या बांधकाम विभागाने शनिवारी एलरो पबवर कारवाई करत अनधिकृत बांधकाम व शेड पाडले. ही कारवाई कार्यकारी अभियंता अजित सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली बांधकाम निरीक्षक विष्णू तौर, राजेंद्र फुंदे, योगेश गुरव यांच्या पथकाने केली. दरम्यान, या बपवर महापालिकेने यापूर्वीही कारवाई केली होती. या कारवाईनंतर पुन्हा अतिक्रमण करण्यात आल्याने पालिकेने एमआरटीपी कलम ५२ नूसार गुन्हा केला आहे.

# मुंबई विद्यापीठाची पदवी फक्त दोन हजार रुपयांत

## शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ : सायबर गुन्हेगारांनी चक्क सोशल मीडियावर केली जाहिरात

**पुणे | प्रतिनिधी**

चक्क सोशल मीडियावर जाहिरात करून मुंबई विद्यापीठाची पदवी फक्त दोन हजार रुपयांत देण्याचा गोरखधंदा पुण्यातील अभिजित खेडकर या जागृत सामाजिक कार्यकर्त्यांने उघडकीस आणला आहे. यामुळे शिक्षणक्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

सामाजिक कार्यकर्ते आणि प्रवासी छायाचित्रकार अभिजित खेडकर यांना फेसबुकवर एक पोस्ट दिसली. त्यामध्ये बारा ते पंधरा हजार रुपयांत घरबसल्या मुंबई विद्यापीठाची पदवी मिळावा, असा मजकूर होता. या माध्यमातून लोकांची फसवणूक होतेय का, हे तपासण्यासाठी त्यामध्ये दिलेल्या मोबाईल क्रमांकावर खेडकर यांनी संपर्क केला. तेव्हा ॲडव्हान्स म्हणून दोन हजार रुपये पाठवा, असे त्यांना सांगण्यात आले. खेडकर यांनी दोन हजार रुपये ऑनलाईन पाठवताच त्यांना व्हॉट्सॲपवर विज्ञान शाखेतील पदवी आली.

ही पदवी सरकारी आणि खासगी नोकरीसाठी चालेल, असे समोरच्या व्यक्तीने सांगितल्याची माहिती खेडकर यांनी दिली. याबाबत पोलिसांकडे तक्रार करून सखोल चौकशीची मागणी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुणे तसेच पिंपरी-चिंचवडमध्ये परराज्यातून पदवीच नव्हे तर डॉक्टरेट मिळविणारे शेकडो आहेत. ते त्यांच्या व्हिजिटिंग कार्डवर ही पदवी लावून फिरत असतात. मात्र राज्यातील कोणत्याही विद्यापीठाची पदवी इतकी सहज मिळत नव्हती. मात्र, आता चक्क मुंबई विद्यापीठासारख्या प्रतिष्ठित विद्यापीठाची पदवी घरबसल्या बारा ते पंधरा हजार रुपयात मिळवा, अशी जाहिरात तीन ते चार दिवसांपूर्वी फेसबुकवर फिरत होती. त्यामुळे उत्सुकता म्हणून पुणे शहरातील अभिजित खेडकर यांनी फेसबुकवर दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता त्यांनी ॲडव्हान्स रुपये पाठवा, असे सांगितले. खेडकर यांनी दोन हजार रुपये ऑनलाईन पाठविले. काही क्षणार्धात त्यांच्या व्हॉट्सॲपवर चक्क विज्ञान शाखेतील पदवीचे गुणपत्रक झळकले. मूळ गुणपत्रक हवे असल्यास उर्वरित पैसे पाठवा, असा संदेशही नंतर आला.




विज्ञानशाखेच्या रिझल्टमध्ये आठही विषयात प्रत्येकी शंभर पैकी ९० गुण तर काही विषयात ८० गुण खेडकरांनी प्राप्त झाले आहेत. विज्ञानशाखेत ८०० पैकी ७१९ गुण मिळवून सीजीपीआय ९.४१ सह खेडकरांनी प्रावीण्य मिळविले आहे. रिझल्ट १० जून २०२३ ला जाहीर झाले असल्याचे या गुणपत्रकात नमूद असून त्यावर मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यांकन संचालकांची सही आहे.

मुंबई विद्यापीठाची बोगस पदवी देणाऱ्या रॅकेटमध्ये विद्यापीठातीलच काही कर्मचारी आणि अधिकारी असू शकतात, अशी शंका खेडकर यांनी 'सीविक मिरर'कडे व्यक्त केली. ही बोगस पदवी गुणपत्रिका राज्यातच नसून देशभरात कितीजणांनी मिळविली आहे, हे सांगणे अवघड असून त्याचा सायबर पोलिसांनी सखोल तपास करण्याची आवश्यकता असल्याचे खेडकर यांनी नमूद केले. संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल करणार आहे. यासह यामध्ये सहभागी असलेल्या व्यक्ती व अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करणार आहे, असेही खेडकर यांनी सांगितले.

### ...तर पदवीची शहानिशा शक्य

राज्यातच नव्हे तर देशातील अनेक राजकीय नेतेमंडळी आपल्या शिक्षणाबद्दलची खोटी माहिती निवडणुकीच्या प्रतिज्ञापत्रात देतात. यामध्ये नेते डॉक्टरेट, वकील, पदवीधर यांचादेखील समावेश असतो. त्यांच्या पदवीची शहानिशा करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे वेळ नसतो. मात्र, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाने १९९० पासूनची दहावी व बारावीची गुणपत्रिका ऑनलाईन टाकली आहे. त्यामुळे एखाद्याची किमान दहावी किंवा बारावी झाली आहे का, याची शहानिशा सहज करता येते. मात्र पदवीधर असल्यास अशा पदवीधारकांची शहानिशा कशी करावी, याचे उत्तर आता नसले तरी भविष्यात सर्व पदवी प्रमाणपत्र किंवा गुणपत्रिका ऑनलाईन टाकल्यास ते शक्य होईल, असे खेडकर म्हणाले.

# 'ताई, वहिनी, मावशी, आजी मतदानाला चला'

## विशेष मोहिमेच्या माध्यमातून महिलांना मतदानासाठी केले जाणार आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

जिल्ह्यात निवडणुकीतील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी आता घरोघरी भेट देऊन महिलांना मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. मागील निवडणुकांमध्ये जिल्ह्यातील कमी मतदान झालेल्या मतदान केंद्रावरील मतदानाची टक्केवारी वाढावी आणि येत्या ७ मे रोजी बारामती व १३ मे रोजी पुणे, मावळ आणि शिरूर मतदारसंघाच्या निवडणुकीत सर्व वयोगटातील महिलांनी अधिकाधिक मतदान करावे यासाठी 'ताई, वहिनी, मावशी, आजी मतदानाला चला' हा अभिनव उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी दिले आहेत.

जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पिंपरी चिंचवड व पुणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. आगामी लोकसभा निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासून मतदान जनजागृतीसाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'ताई, वहिनी, मावशी, आजी मतदानाला चला' या उपक्रमांतर्गत बालविकास प्रकल्प अधिकारी, पुणे मनपाचे आरोग्य प्रमुख, पिंपरी चिंचवड तसेच उपआयुक्त समाज कल्याण विभाग यांच्याअंतर्गत काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ती, बचत गटातील महिला, समूह संघटिका यांचे गट तयार करुन मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देणार आहेत.

महिला मतदारांचा मतदानात कमी सहभाग असलेल्या केंद्राची माहिती घेण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यात येईल. जिल्ह्यातील ४ हजार ९०० पेक्षा जास्त मतदान केंद्र परिसरात ही मोहीम राबविण्याचे नियोजन आहे. महिलांना मतदान करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी जिल्ह्यात २१ महिला संचालित मतदान केंद्र असणार आहेत. मतदान केंद्रांवर महिलांसाठी स्वतंत्र रांग, पाळणाघर, पाळणाघरात अंगणवाडी सेविका, स्वतंत्र स्वच्छतागृह आदी आवश्यक मूलभूत सुविधादेखील असतील.



हा उपक्रम राबविताना घरोघरी भेटीदरम्यान महिला, वृद्ध, दिव्यांगांना मतदानाचे महत्त्व सांगण्यात येईल. निवडणूक आयोगाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याच्या आणि मतदान सुलभ व समावेशक व्हावे यासाठी मतदानाच्या ठिकाणी देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती देण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. नेमून दिलेल्या भागातील कोणतीही वस्ती, नागरिक दुर्लक्षित राहणार नाहीत याची काळजी घ्यावी, घरभेटी दरम्यान मतदारांशी नम्रता व सौजन्यपूर्वक संवाद साधावा, आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही प्रशासनातर्फे देण्यात आल्या आहेत, अशी माहिती स्वीप समन्वयक अर्चना तांबे यांनी दिली आहे.

डॉ.सुहास दिवसे, जिल्हा निवडणूक अधिकारी-जगातील अनेक देशात महिलांना मताधिकारासाठी लढा द्यावा लागला. मात्र आपला देश स्वतंत्र झाल्यावर लगेचच महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. लोकशाही प्रक्रियेत महिलांचाही सहभाग महत्वाचा आहे. महिला मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे यासाठी मतदान केंद्रांवर महिला मतदारांसाठी आवश्यक सुविधा आहेत. महिला मतदारांनी मोठ्या संख्येने लोकशाहीच्या या उत्सवात सहभाग घेत मतदान करावे, विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी मतदार नोंदणी करून मतदान प्रक्रियेत उत्साहाने सहभागी व्हावे आणि इतरांनाही त्यासाठी प्रेरित करावे.

# सांडपाणी रस्त्यावर, दुर्गंधीने नागरिक त्रस्त

## भूमिगत सांडपाणी वाहिनी तुंबल्याने दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर पसरले

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे येथील मारुती मंदिर चौकाच्या वळणावर शनिवारी (ता.१३) सकाळी भूमिगत सांडपाणी वाहिनी तुंबल्याने दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर पसरले होते. परिणामी रस्त्यावरून ये-जा करताना नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत होता.

गेल्या दहा दिवसांपासून येथील सांडपाणी वाहिनी तुंबून रस्त्यावर पाणी पसरत आहे. या ठिकाणी पाण्याच्या वाहिनीसाठी खोदाई करण्यात आली होती. खोदाई करताना भूमिगत सांडपाणी वाहिनीत माती जाऊन ती तुंबली आहे. नागरिक व वाहनचालकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

येथून वाहने वेगात जातात. त्यामुळे दुर्गंधीयुक्त पाणी पादचाऱ्यांच्या अंगावर उडत आहे. परिणामी वादाचे प्रसंग उद्भवत आहेत. तसेच पाणी आणि मातीमुळे दुचाकी घसरून पडण्याच्या घटनाही घडत आहेत. आरोग्य विभागाने येथील तुंबलेल्या सांडपाणी वाहिनीचे साफसफाई करावी, अशी मागणी नागरिक व वाहनचालक करीत आहेत.

परिसरातील नागरिक अनेक समस्यांचा सामना करीत आहेत. त्यातील एक समस्या म्हणजे रस्त्यावर साचणारे सांडपाणी.



नळाचे पाणी वाया जाते व ते असे रस्त्यावर येते. त्यामुळे दुर्गंधी सुटते. तसेच डासांचाही प्रादुर्भाव वाढतो. असे छापून येताच तातडीने दखल घेतली.

दुर्गंधी इतकी वाढली आहे की निवासी क्षेत्र दुर्गंधीयुक्त आणि धोकादायक ओव्हरफ्लोने बुडले आहेत, ज्यामुळे सार्वजनिक आरोग्य आणि रहिवाशांच्या एकूण कल्याणासाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे.या सांडपाणी ओव्हरफ्लोचे परिणाम गंभीर झाले आहेत, अनेक रहिवाशांना त्यांची घरे सोडता येत नाहीत. गेल्या आठवडाभरापासून, विद्यार्थ्यांना या महत्त्वपूर्ण काळात त्यांच्या अभ्यासात व्यत्यय आणून घरीच राहावे लागले आहे.

दुर्दैवाने, या प्रक्रियेमुळे रस्त्यावर पाणी साचून त्याचे तलावात रुपांतर झाले. धुळीमुळे रस्त्यावर वाहनधारकांची वाहतूक कोंडी झाली. रस्त्यावर पाणी साचल्याने अनेक स्थानिकांना त्यांच्या दैनंदिन प्रवासासाठी दुचाकींवर अवलंबून राहावे लागले आहे. याशिवाय घरांजवळ साचलेल्या साचलेल्या पाण्यामुळे डासांची संख्या वाढली आहे.

### आरोग्यास गंभीर धोका...

» दाट वस्तीच्या परिसरात गटारीचे घाणेरडे पाणी रस्त्यावर वाहत आहे. या गळतीमुळे येणारी दुर्गंधी असह्य आहे. आणि डासांच्या उत्पत्तीमुळे अनेक आठवडे घाणेरडे पाणी साचून राहणे आरोग्यास गंभीर धोका आहे. जवळपासच्या रहिवासी सोसायट्यांमधील रहिवासी सांडपाणी/ड्रेनेजचे पाणी सतत रस्त्यावर वाहत असल्याने दुर्गंधी आणि आरोग्याच्या समस्या उद्भवत आहेत.

# खासदार कोल्हे सुसंस्कृत लोकप्रतिनिधी

## अजित पवार यांच्या 'नटसम्राट' टीकेनंतर सुप्रिया सुळे यांची प्रतिक्रिया

**पुणे | प्रतिनिधी**

अजित पवार म्हणाले की, तुम्हाला कार्यसम्राट खासदार पाहिजे की, नटसम्राट खासदार? असे म्हणत त्यांनी खासदार अमोल कोल्हे यांना टोला लगावला होता. यावर अमोल कोल्हे यांनी ट्विटद्वारे प्रतिक्रिया दिली असून यावर सुप्रिया सुळे यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे.

शिरुर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मेळावा दोन दिवसांपूर्वी पार पडला. या मेळाव्यात अजित पवार म्हणाले की, तुम्हाला कार्यसम्राट खासदार पाहिजे की, नटसम्राट खासदार? असे म्हणत त्यांनी खासदार अमोल कोल्हे यांना टोला लगावला होता. यावर अमोल कोल्हे यांनी ट्विटद्वारे प्रतिक्रिया दिली असून यावर सुप्रिया सुळे यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे.

अजित पवार यांच्या टीकेला प्रतिक्रिया देत अमोल कोल्हे यांनी ट्विटर करत उत्तर दिले. कार्यसम्राट की नटसम्राट माहीत नाही, पण स्वकर्तृत्वसम्राट नक्की! असं ट्विट करत माझ्या काकांच्या पुण्याईवर मी डॉक्टर, अभिनेता नाही तर स्वकर्तृत्वावर मी माझी ओळख असल्याचे सांगत अमोल कोल्हे यांनी अजित पवार पवार यांना सुनावले होते. त्यावर सुप्रिया सुळे यांनी देखील विधान केले.



सुप्रिया सुळे म्हणाल्या, हे दुर्दैव आहे. अमोल कोल्हे हे एक अतिशय सुसंस्कृत लोकप्रतिनिधी आहेत. अमोल कोल्हे यांचे संसदेतील काम सर्वोत्तम असून त्यांनी मतदारसंघातदेखील खूप विकास कामे केली आहेत. त्यामुळे कोणी काय बोलावं हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे, अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली.

अजित पवारांच्या वक्तव्याबाबत खासदार सुप्रिया सुळे यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, "आमच्या विरोधात काहीही नसताना आत्ता वैयक्तिकरित्या टीका करत आहे. मी राजकारणात समाजसेवा करण्यासाठी आले आहे. आमच्याकडे काही नसतानाही वैयक्तिकरित्या टीका केली जातेय. तसंच अमोल कोल्हे यांचं काम चांगलं आहे. मतदारसंघातील त्यांचं काम चांगलं आहे. आता कोणी काय बोलावं, हा त्यांचा वैयक्तिक अधिकार आहे."

### अमोल कोल्हे यांची ट्विटद्वारे प्रतिक्रिया

» शिरुर लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमोल कोल्हे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत अजित पवार यांना प्रत्युत्तर दिलंय. खासदार कोल्हे यांनी केलेल्या पोस्टमध्ये लिहिलंय की, "कार्यसम्राट की नटसम्राट माहीत नाही. पण स्वकर्तृत्वसम्राट नक्की! 2001 साली "सांगा उत्तर सांगा" या कार्यक्रमाचा निवेदक म्हणून या वास्तूच्या पायऱ्या चढलो ते माझे 'काका' अभिनय क्षेत्रात नव्हते. तर स्वतःच्या टॅलेंट आणि कर्तृत्वाच्या जोरावर आणि योगायोगानं आज 2024 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या राजकीय पक्षाची अधिकृत भूमिका मांडण्यासाठी याच वास्तूच्या पायऱ्या चढलो. ते ही काकांच्या नाही तर 'स्व'कर्तृत्वाच्या जोरावर पायऱ्या चढलो."

मंमदवाडी भागातील जाहीर सभेत बोलताना अजित पवार म्हणाले होते, "तुम्हाला नटसम्राट खासदार पाहिजे की कार्यसम्राट खासदार पाहिजे, याचा विचार करा. अमोल कोल्हे यांच्या प्रचारासाठी मी खूप फिरलो. त्यांच्यासाठी काम केलं. ते खासदार म्हणून निवडून आले. पण दोनच वर्षांनी ते माझ्याकडे आले. खासदारकी माझं काम नाही, असे मला म्हणाले. मला राजीनामा द्यायचं असून अभिनय हा माझा व्यवसाय आहे. त्यावेळेस मी म्हणालो अरे बाबा थोडं थांब. तुला निवडून दिलेलं आहे. आता ही पाच वर्षे पूर्ण कर. ते म्हणालेसुद्धा मी पुन्हा थांबणार नाही. त्यामुळं तुम्हाला नटसम्राट खासदार हवा का कार्यसम्राट याचा विचार करा."

प्रचारात जेष्ठ नागरिकांकडून टीका होत असताना दिलीप वळसे पाटील रुग्णालयात उपचार घेत असताना त्यांना या राजकारणाच्या रिंगणात ओढणं चुकीचं असल्याचं सांगत राजकारणातील सुसंस्कृतता प्रत्येकाने जपली पाहिजे हीच यामागील भावना होती, असं कोल्हे म्हणाले. निवडणूक येते, जाते, पद येतात, जातात पण राजकारणाचा स्तर घसरू नये ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे, असंही त्यांनी सांगितलं.

# ऐतिहासिक कात्रज तलाव एप्रिलमध्येच रिकामा

## पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असताना, कात्रज तलावानेही तळ गाठला

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असताना, अनेक धरणांनी तळ गाठला असताना पुण्यातील पेशवेकालीन कात्रज तलावानेही तळ गाठला आहे.

राज्यात पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असताना, अनेक धरणांनी तळ गाठला असताना पुण्यातील पेशवेकालीन कात्रज तलावानेही तळ गाठला आहे. महापालिकेकडून जुलैमध्ये तलावातील गाळ काढून तलावाची साठवण क्षमता वाढवण्यात आली. मात्र, एप्रिलमध्येच तलावातील पाणी आटल्याचे दिसून येत आहे. सध्या हा तलाव राजीव गांधी प्राणिसंग्रहालयाचा भाग आहे. या तलावामुळे या परिसरातील जैवविविधता टिकून राहिली आहे. २०१९ मध्ये झालेल्या ढगफुटीसदृश पावसावेळी कात्रज तलाव पूर्ण भरून वाहिल्याने पाणी आंबील ओढ्यात येऊन पर्वती, सहकारनगरमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. या तलावात मोठ्या प्रमाणात गाळ आणि जलपर्णी निर्माण झाली होती. त्यामुळे महापालिकेच्या सांडपाणी आणि मलनिस्सारण विभागाने जुलै २०२३ मध्ये कात्रज तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेतले होते. त्या अंतर्गत दहा हजार घनमीटर गाळ काढण्यात आला. तलावातील गाळ काढल्याने तलावाची साठवणूक क्षमता एक कोटी लीटरने वाढल्याचे महापालिकेचे म्हणणे होते. मात्र यंदा एप्रिलमध्येच तलावाने तळ गाठल्याचे पाहायला मिळत आहे.



कात्रज तलावातील पाणी कमी होण्यासंदर्भात पर्यावरण अभ्यासक डॉ. श्रीकांत गबाले म्हणाले, की पर्जन्यमान लक्षात घेऊन २०१९ पासून कात्रजचा तलाव कमी भरला जातो. यंदा पाऊस कमी पडल्यामुळे कात्रज तलाव पूर्ण भरला नव्हता. त्यामुळे पाण्याचे प्रमाण आधीच कमी होते. त्याशिवाय तलावात सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी स्वतंत्र प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यामुळे त्या पाण्याचे प्रमाण कमी झाले. तलावात जलपर्णी वाढल्यामुळे, बाष्पीभवन जास्त झाल्यासही पाणी कमी होऊ शकते. तसेच महापालिकेने गाळ काढण्यासाठी तलावातील पाणी कमी केलेले असू शकते. दरम्यान, गाळ काढण्याच्या कामासाठी तलावातील पाण्याची पातळी कमी करण्यात आली होती, अशी माहिती महापालिकेच्या सांडपाणी आणि मलनिस्सारण विभागाचे अधीक्षक संतोष तांदळे यांनी दिली.

### कात्रज तलावाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

सुमारे ४२ एकरात असलेल्या कात्रज तलावाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीबाबत इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांनी माहिती दिली. नानासाहेब पेशवे यांनी १७४५ ते १७५५ या काळात कात्रजचा तलाव बांधला. या तलावातील पाण्याचा पुरवठा शनिवारवाडा आणि जुन्या पुण्यातील काही भागात भुयारी मार्गाने केला जायचा. या भुयारी मार्गादरम्यान काळा हौद, बाहुलीचा हौद, बदामी हौद, सदाशिव पेठ हौद येथे पाणी काढले जायचे. १९९० पर्यंत तलावातील पाण्याचा पुरवठा शहराला केला जायचा, असे त्यांनी सांगितले. कात्रज तलावात गळती आहे का, हेही तपासणे आवश्यक आहे.